<u>-: प्रेसनोट दिनांक - ०७/०२/२०२४ :-</u>

**आरोपी लोकसेवक अमोल आनंदा जाधव, वय- ३९ वर्षे, पद- तलाठी, सज्जा - कसबा इचलकरंजी, वर्ग - ३, सद्या रा. बाबासाहेब डोळे यांचे घरी भाडयाने यशवंत रेसिडेन्सी, आर.के.नगर, शहापूर इचलकरंजी, मुळ रा. कोरवी गल्ली, आगर रोड शिरोळ, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर यांनी लाच मागणी करून ती लाच रक्कम स्विकारलेबाबत.....**

---

तक्रारदार यांचे नातेवाईक यांना इचलकरंजी येथील रिसन ४५२ क्षेत्र ०.०.९० आर इतकी मिळकत रजिस्टर बक्षीसपत्राने (नातेवाईक यांचे वडीलांनी) २०१९ मध्ये दिलेली आहे. सदर मिळकतचे सात बारा वरती नाव नोंद करणेसाठी तक्रारदार हे आवश्यक ती सर्व कागदपत्रे घेवुन कसबा इचलकरंजी येथील तलाठी अमोल जाधव यांना भेटुन त्यांचे नातेवाईक यांचे बक्षीसपत्राप्रमाणे नाव नोंद करणेसाठी कागदपत्रे दिली त्यावेळी तलाठी अमोल जाधव यांनी तक्रारदार यांचेकडे ४,०००/- रूपये दयावे लागतील असे म्हणुन पैशाची मागणी केली.

दिनांक १५/०१/२०२४ रोजी तक्रारदार यांनी अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर येथे तक्रार अर्ज दिला. त्यांचे तक्रारीप्रमाणे पडताळणी केली असता पडताळणीमध्ये आरोपी **अमोल आनंदा जाधव पद- तलाठी, सज्जा - कसबा इचलकरंजी, वर्ग -३** यांनी तक्रारदार यांचेकडे सातबारा पत्रकी नोंद करणेकामी ५,०००/- रूपयांची मागणी केली त्यांनतर त्यांनी तडजोडी अंती तक्रारदार यांचेकडे ४,०००/- लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर दिनांक ०७/०२/२०२४ रोजी सापळा कारवाई आयोजीत केली असता पंच साक्षीदारांचे समक्ष तक्रारदार यांचेकडुन **अमोल आनंदा जाधव पद- तलाठी, सज्जा - कसबा इचलकरंजी, वर्ग -३** यांनी मागणी केलेली लाच रक्कम ४०००/- रूपये स्विकारलेने त्यांना रंगेहाथ पकडणेत आले आहे.

सदरबाबत **आरोपी लोकसेवक अमोल आनंदा जाधव, वय- ३९ वर्षे, पद- तलाठी, सज्जा - कसबा इचलकरंजी, वर्ग - ३, सद्या रा. बाबासाहेब डोळे यांचे घरी भाडयाने यशवंत रेसिडेन्सी, आर.के.नगर, शहापूर इचलकरंजी, मुळ रा. कोरवी गल्ली, आगर रोड शिरोळ, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर** यांचेविरूध्द इचलकरंजी पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करणेची कारवाई सुरू आहे.

सदरची कारवाई श्री. अमोल तांबे, पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे, श्री. विजय चौधरी, अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे यांचे तसेच श्री सरदार नाळे, पोलीस उप अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांचे मार्गदर्शनानुसार पोलीस निरीक्षक श्रीमती आसमा मुल्ला, श्री प्रकाश भंडारे, स.पो.फौ, पो.हे.कॉ.अजय चव्हाण, पो.ना.सुधीर पाटील, पो.ना.सचिन पाटील, पो.कॉ. संदिप पवार, चा.पो.हे.कॉ. सुरज अपराध, विष्णु गुरव अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे.

**सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की,लाचेच्या अथवा अपसंपदेबाबतच्या तक्रारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील कंमाकावर संपर्क साधावा.**

**१) मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा.मुंबई टोल फ्री कमांक :- १८००२२२०२१**
**२) मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे दुरध्वनी कमांक :- ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३.**
**३) श्री.सरदार नाळे, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर मो.नं. ९६७३५०६५५५ कार्यालय दुरध्वनी कमांक - ०२३१/२५४०९८९.**
**४) हेल्पलाईन टोल फ्री कमांक:- १०६४.**
**५) व्हॉटस अप कमांक :- ७८७५३३३३३३.**

( सरदार नाळे )
पोलीस उपअधीक्षक,
अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर